२११२९१ बी-2

Valvi Madam/77-A Order

# सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,भिवंडी तालुका यांचे कार्यालय

दत्तात्रेय कृपा बिल्डींग ३ रा माळा,स्टेट बॅंकेसमोर, जकात नाका,सेंन्ट्रल हॉस्पीटलच्या वर,भिवंडी, जि. ठाणे

---

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७अ (१)(ब-१) अन्वये आदेश

---

११०८

जा.क्र.सनिभि/बी-१/कलम ७७ अ/प्राधिकृत अधिकारी/ /सन २०१७
दिनांक :- १९/१२/२०१७

वाचावे :- १) ओम साई रेसिडेन्सी को-ऑप- हौसिंग सोसायटी लि.ब्राम्हणआळी , ता.भिवंडी या संस्थेचे सभासद श्री. जयेश शाह व इतर १९ सभासदांकडून प्राप्त झालेला दिनांक ३०/०८/२०१७ रोजीचा तक्रार अर्ज.

२) या कार्यालयाकडील पत्र संदर्भ जा.क्र.सनिभि/बी-२/हौ.तक्रार/ओम साई रेसिडेन्सी/सन२०१७ दि. २७/०९/२०१७

३) श्री. किरण मेघजी प्रजापती, श्री. मिलिंद मुरलीधर मुढे, श्री. संजय बापू शिंदे यांचे दि. १७/११/२०१७ रोजीचे पत्र

४) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ ची तरतूद

ज्याअर्थी, ओम साई रेसिडेन्सी को-ऑप- हौसिंग सोसायटी लि. ब्राम्हणआळी , ता.भिवंडी जि.ठाणे ही ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ अन्वये नोंदणीकृत संस्था असून तिचा नोंदणी क्र. टिएनए/बीडब्ल्यूआय/एचएसजी/(टिसी)/२६५१९/२०१४-१५/सन २०१४, दिनांक २७/०६/२०१५ असा आहे आणि, ती या कार्यालयाच्या कार्यकक्षेत येते. आणि,

ज्याअर्थी, संस्थेचे कामकाज महाराष्ट्र सहाकारी अधिनियम १९६० व नियम १९६१ व संस्थेच्या मंजुर उपविधीतील तरतुदीनुसार चालविणे बंधनकारक आहे आणि,

ज्याअर्थी, संस्थेच्या श्री. जयेश शाह व इतर १९ सभासद यांनी श्री. धनंजय परशुराम जाधव, सेक्रेटरी यांच्या अनागोंदी कारभाराबाबत व कमेटीची निवड योग्य न झाल्याबाबत उपरोक्त वाचावे क्र. १ अन्वये या कार्यालयाकडे तक्रार अर्ज दाखल केल्याने या कार्यालयाने वाचावे क्र. २ च्या पत्रान्वये या कार्यालयाकडील पत्र संदर्भ जा.क्र.सनिभि/बी-२/हौ.तक्रार/ओम साई रेसिडेन्सी/सन२०१७ दि. २७/०९/२०१७ अन्वये या कार्यालयामध्ये तक्रारदार व संस्था पदाधिकारी यांच्या समवेत सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी संस्थेचे सेक्रेटरी श्री. धनंजय परशुराम जाधव, गैरहजर राहिलेले आहेत. आणि,

ज्याअर्थी, संस्थेच्या व्यवस्थापक समितीची निवडणुक महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ सी बी अन्वये राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणमार्फत होणे बंधनकारक असतानाही सदरची निवडणुक त्या अनुषंगाने या कार्यालयामार्फत झालेली नाही, त्यामुळे संस्थेच्या व्यावस्थापक समितीस कायदेशिर अस्तित्व प्राप्त होत नाही.

ज्याअर्थी, संदर्भाधिन वाचावे क्र. ३ अन्वये प्राधिकृत अधिकारी मंडळा मध्ये काम करण्यास १) श्री. किरण मेघजी प्रजापती, २) श्री. मिलिंद मुरलीधर मुढे, ३) श्री. संजय बापू शिंदे यांनी दि. १७/११/२०१७ रोजी सभासद यांनी